# महाराष्ट्र शासन

## इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com


**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/ 2769 /2024-25 दिनांक :- 11/10/2024

## UPSC - 2024-25 परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी पुणे येथील प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता परिपत्रक

महाज्योती या संस्थेमार्फत UPSC - 2024-25 परीक्षा पूर्व ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता दि.25/09/2024 रोजी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संस्थानिहाय यादी यासह प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच याद्वारे प्रशिक्षण कार्यवाही सुरु करण्यात येत आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी ज्ञानदिप अकॅडमी, पुणे व युनिक अकॅडमी, पुणे येथे दि.11/10/2024 ते दि.15/10/2024 रोजी पर्यंत प्रशिक्षण केंद्रास प्रत्यक्ष जाऊन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करून घ्यावी.

- **प्रवेश प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:-**

1. आधारकार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. पदवीचे उत्तीर्ण गुणपत्रिका / प्रमाणपत्र
5. दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र
6. अनाथ असल्यास प्रमाणपत्र

(मुळ कागदपत्रे व स्वयं स्वाक्षांकीत झेरॉक्स घेवून उपस्थित राहावे)

- **प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता - संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे:-**

1. **ज्ञानदिप ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**

**संपर्क क्र.** 1) श्याम भोसले (8888136599)
2) माधुरी पोपडे (8830146428)

**पत्ता** - TCG स्क्वेअर बिल्डींग, अल्का टॉकीज समोर, अल्का टॉकीज चौक, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे - 411030

2. **युनिक ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**

**संपर्क क्र.** 1) गणेश पवार (9175096040)
2) चक्रधर गोरे (9822045272)
3) कैलास शेंडगे (9657183344)
4) राजेंद्र खेडकर (9890399930)

**पत्ता** - द युनिक ॲकडमी, अक्षरनंदन शाळे जवळ, गोखले नगर रोड, सेनापती बापट रोड समोर, प्राईड पोर्टलच्या बाजुला, शिवाजी को-ऑपरेटिव्ह सोसायटी, गोखलेनगर, पुणे - 411016

- **<u>रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना:-</u>**

1. प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल, याची नोंद घ्यावी.
2. ज्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट 'ब' व 'क', महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, Staff Selection Commission Combined Graduate Level (SSC-CGL), बँकींग (IBPS-PO) किंवा महाज्योतीच्या इतर योजनांचा लाभ घ्यायचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया करु नये. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
3. कोणत्याही माध्यमातून व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी महाज्योतीच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
4. सदर संस्थेत दि.15/10/2024 पर्यंत तात्पुरत्या निवड यादीतील विद्यार्थी रुजु न झाल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना रिक्त जागेवर संधी देण्यात येईल.
5. सद्यस्थितीत महाज्योती कार्यालयाकडे UPSC परीक्षापुर्व प्रशिक्षणाकरीता केवळ महाराष्ट्रामधील प्रशिक्षण संस्था उपलब्ध आहेत. ज्या विद्यार्थ्यांना दिल्ली येथील संस्था हवी असेल अशा विद्यार्थ्यांनी महाज्योती कार्यालयाकडे अर्ज करावा. दिल्ली येथील प्रशिक्षण संस्था इम्पॅनलमेंट पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना दिल्ली येथील संस्था उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच संबंधित विद्यार्थ्यांची जागा दरम्यानच्या कालावधीमध्ये राखून ठेवण्यात येईल.
6. सदर परिपत्रकासोबत पात्र विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे. निवड यादीतील जे विद्यार्थी प्रवेश घेणार नाही त्यांची जागी प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्राप्त गुणांकानुसार प्रधान्य देण्यात येईल.

(स्वा)
(राजेश खवले)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर